


# आर.टी.ई. ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०१९-२०२०

## F.A.Q. (वारंवार विचारण्यात येणारे/उदभवणारे प्रश्न)

1) २५% ऑनलाईन प्रवेशासाठी कोणती बालके पात्र आहेत ?

**उत्तर** -वंचित गटांतर्गत अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती,दिव्यांग बालकांव्यतिरिक्त वि.जा.(अ),भटक्या जमाती (ब) भटक्या जमाती (क) भटक्या जमाती (ड) इतर मागास वर्ग (OBC),व विशेष मागास प्रवर्ग एस.बी.सी एस.ई.बी.सी, एच.आय.व्ही.बाधित /एच.आय.व्ही.प्रभावित बालके पात्र आहेत.

तसेच दुर्बल घटकांतर्गत कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु.एक लाखापर्यंत असणारे खुल्या प्रवर्गासह धार्मिक अल्पसंख्यांक बालके पात्र आहेत .(मुस्लिम, बौध्द,ख्रिश्चन, पारसी, जैन व शीख.)

२) कोणत्या प्रकारच्या शाळा प्रवेशासाठी पात्र आहेत? (माध्यम व बोर्ड )

**उत्तर**- सर्व माध्यमाच्या,सर्व बोर्डाच्या(राज्यमंडळ,सी.बी.एस.ई., आय.सी.एस.ई.व आय.बी.सह),स्वयंअर्थसहाय्यित, विनाअनुदानित (अल्पसंख्यांक वगळून,कायम विनाअनुदानित (अल्पसंख्यांक)वगळून, तसेच मदरसा, मक्तब, व धार्मिक पाठशाळा वगळून सर्व कायम विनाअनुदानित व विनाअनुदानित प्राथमिक शाळा जेथे वर्ग १ ली किंवा पूर्व प्राथमिक स्तरावरील आहे.

३) पालकांना अर्ज केव्हा करता येईल?

**उत्तर**- सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षासाठी ठरवून दिलेल्या कालावधी मध्येच ऑनलाईन अर्ज करता येईल.

४) पालकांना ऑनलाईन अर्ज किती वेळा भरता येईल?

**उत्तर**- प्रवेशासाठी फक्त एकदाच अर्ज भरता येणार आहे.

५) अर्ज कोठून भरावा लागेल?

**उत्तर**- मदत केंद्रांवर किंवा जेथे इंटरनेट सुविधा, संगणक ,प्रिंटर इ. उपलब्ध असेल तेथून किंवा मोबाईलवर rte चे app download करून अर्ज भरावा .

६) अर्ज भरताना कोणती कागदपत्र अपलोड करावीत ?

उत्तर :- अर्ज भरताना कोणतेही कागदपत्रे अपलोड करायची नाहीत मात्र ऑनलाईन अर्ज भरताना पुढील कागदपत्रे जवळ असणे आवश्यक आहे.

१) अर्जामध्ये रहिवासाचा पत्ता लिहिण्यासाठी रहिवासाचा पुरावा. (रहिवासी पुराव्यावरील पत्ता अर्जावर लिहावा )

२)बालकाचे जन्म दिनांकाची नोंद करण्यासाठी जन्माचा दाखला.

३) बालक वंचित घटकातील असल्यास जातीची नोंद करण्यासाठी जातीचे प्रमाण पत्र.

४) बालक आर्थिक दुर्बल गटातील असल्यास बालकांच्या वडिलांचा उत्पन्नाचा दाखला (आर्थिक वर्ष सन२०१७-१८/२०१८-१९)

तसेच लॉटरी लागल्यास सर्व आवश्यक कागद पत्रे, असणे आवश्यक आहे व ती पडताळणी समितीकडे सादर करणे आवश्यक आहे अन्यथा मिळालेला प्रवेश रद्द होऊ शकतो याची नोंद घ्यावी.

७) प्रवेश अर्जाला किती शुल्क आहे?

**उत्तर**- प्रवेश अर्जाला शुल्क नाही .शैक्षणिक वर्ष सन २०१९-२० ची २५ % ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचे अर्ज मोफत स्वरुपात संकेत

स्थळावर (वेबसाईटवर) उपलबध असून वरील संकेत स्थळावर (वेब साईटवर )जावून किंवा मोबाईलवर भरावयाचा आहे.

८) २५% ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्याचीवेब-साईटकोणतीआहे?

उत्तर-१)सदरचा अर्ज rte25admission.maharashtra.gov.in किंवा , http://student.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर वेबसाईटवर जाऊन आर.टी.ई पोर्टल वर clickकरावे.आणि ऑनलाईन भरावयाचा आहे.

२)आर.टी.ई. करिता स्वतंत्र मोबाइल ॲप उपलब्ध आहे. कोणत्याही andorid मोबाईलवर त्यावर देखील अर्ज भरता येईल परंतु त्या साठी इंटरनेटची सुविधा असणे आवश्यक आहे.

९) पालक किती शाळा व कोणत्या माध्यमासाठी अर्ज करू शकतात?

**उत्तर-** ऑनलाईन माहिती भरताना पालक त्यांच्या रहिवासी क्षेत्रापासून १ कि.मी.व ३ कि.मी. आणि अधिक अंतरापर्यंतच्या उपलब्ध असणाऱ्या फक्त १० शाळांचे पर्याय तसेच उपलब्ध सर्व माध्यमातून माध्यम निवडण्याचे स्वातंत्र्य पालकांना राहील.

१०)शाळेपासून किती कि.मी. अंतरातील रहिवासी अर्ज करू शकतात?

**उत्तर-** पालक 1 किमी,३ किमी, अंतरावरील शाळेसाठी अर्ज दाखल करू शकतात.शाळेपासून ३ कि.मी. पर्यंतच्या परिसरातील रहिवासी अर्ज करू शकतील. मात्र शाळेपासून १ कि.मी. परिसरातील अर्जदारांन नियमाने प्राधान्य मिळेल. १ कि.मी. परिसरातील पुरेशा क्षमतेइतकी बालके उपलब्ध न झाल्यासच ३ कि.मी.आणि त्या

पेक्षा अधिक अंतराच्या परिसरातील बालके संबधित शाळेत प्रवेशास पात्र होतील. मात्र ३ कि.मी पेक्षा अधिक अंतराच्या शाळेकरिता लॉटरी लागली तर त्या वेळेस विद्यार्थ्याच्या वाहतुकीचा खर्च संबधित पालकास करावा लागेल.

११) अर्ज केला म्हणजे खात्रीशीर प्रवेश मिळेलच का?

**उत्तर-** शाळेच्या आरंभीच्या वर्गाच्या २५ % प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास सोडत/लॉटरी पद्धतीने प्रवेश दिले जातील. अशा परिस्थितीत प्रत्येक अर्जदाराच्या पाल्याला प्रवेश मिळेलच असे नाही.

12) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती यांना प्रवेशासाठी कोणती कागदपत्रे /प्रमाणपत्रे आवश्यक आहेत?

**उत्तर-** जन्माचा दाखला,जातीचे प्रमाणपत्र (पिता/बालक) रहिवासीपुरावा(आधार कार्ड/पासपोर्ट/मतदार ओळख पत्र/ वीज बिल /टेलिफोन बिल/पाणी पट्टी/घर पट्टी/वाहन चालविण्याचा परवाना/ भाडे तत्वावर राहणाऱ्या पालकांच्या बाबतीत दुय्यम निबंधक कार्यालयाचा नोंदणीकृत भाडेकरारनाम्याची प्रत / प्रॉपर्टी टॅक्स देयक/ गॅस बुक/ बँक पासबुक/ड्रायविंग लायसन्स/ रेशनिंग कार्ड यापैकी कोणतेही एक )

११) दिव्यांग बालकाच्या प्रवेशाचे निकष व आवश्यक कागदपत्रे कोणती?

**उत्तर-** सर्व जाती धर्मातील(विकलांग) दिव्यांग बालके प्रवेशास पात्र.दिव्यांग असल्याचे प्रमाण पत्र ४०% पेक्षा अधिक असल्याबाबतचे जिल्हा शल्यचिकित्सक किंवा वैद्यकीय अधीक्षक यांचेप्रमाणपत्र,
जन्माचादाखला,रहिवासीपुरावा(आधारकार्ड/पासपोर्ट/मतदारओळखपत्र/वीज

बिलटेलिफोनबिल/पाणी पट्टी/घर पट्टी/वाहन चालविण्याचा परवाना/ भाडे तत्वावर राहणाऱ्या पालकांच्या बाबतीत दुय्यम निबंधक कार्यालयाचा नोंदणीकृत भाडेकरारनाम्याची प्रत / प्रॉपर्टी टॅक्स देयक/ गॅस बुक/ बँक पासबुक/ड्रायविंग लायसन्स/ रेशनिंग कार्ड यापैकी कोणतेही एक)

घटस्फोटीत महिलांच्या बालकांसाठी आवश्यक कागद पत्रे कोणती?

उत्तर :-1)न्यायालयाचा निर्णय.२)घटस्फोटित महिलेचा/ बालकाच्या आईचा रहिवासी पुरावा.

२)बालक वंचित गटातील असल्यास बालकाचे किंवा त्याच्या वडिलांचे जातीचे प्रमाण पत्र व बालक आर्थिक दुर्बल गटातील असल्यास बालकाच्या आईचा उत्पन्नाचा दाखला.

१२)न्यायप्रविष्ट असलेल्या घटस्फोटा प्रकरणातील महिलांच्या बालकांसाठी आवश्यक कागद पत्रे कोणती?

उत्तर :-1)घटस्फोटाचे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचा पुरावा.२)घटस्फोट प्रकरण न्यायप्रविष्ट असलेल्या महिलेचा/ बालकाच्या आईचा रहिवासी पुरावा. ३)बालक वंचित गटातील असल्यास बालकाचे किंवा त्याच्या वडिलांचे जातीचे प्रमाण पत्र व बालक आर्थिक दुर्बल गटातील असल्यास बालकाच्या आईचा उत्पन्नाचा दाखला.

१३)विधवा महिलेच्या बालकांसाठी आवश्यक कागद पत्रे कोणती?

उत्तर :-1)पतीचे मृत्यूपत्र. २) विधवा महिलेचा /बालकाच्या आईचा रहिवासी पुरावा. ३)बालक वंचित गटातील असल्यास

बालकाचे किंवा त्याच्या वडिलांचे जातीचे प्रमाण पत्र व बालक आर्थिक दुर्बल गटातील असल्यास बालकाच्या आईचा उत्पन्नाचा दाखला.

१४)अनाथ बालकांसाठी आवश्यक कागद पत्रे कोणती?

उत्तर :-1)अनाथ बालकांच्या बाबतीत अनाथालयाची कागदपत्रे ग्राह्य धरण्यात यावीत.

२)जर बालक अनाथालयात राहत नसेल तर जे पालक त्याचा सांभाळ करतात त्यांचे हमीपत्र आवश्यक राहील.

१५)खुला प्रवर्ग,अल्पसंख्यांक, यांना प्रवेश साठी कोणकोणती कागदपत्रे/प्रमाणपत्रे आवश्यक आहेत?

**उत्तर**- जन्माचा दाखला,रहिवासी,पुरावा,(आधारकार्ड/पासपोर्ट/मतदार ओळख पत्रवीज बिल /टेलिफोन बिल/पाणी पट्टी/घर पट्टी/वाहन चालविण्याचा परवाना / भाडे तत्वावर राहणाऱ्या पालकांच्या बाबतीत दुय्यम निबंधक कार्यालयाचा नोंदणीकृत भाडेकरारनाम्याची प्रत/ प्रॅापर्टी टॅक्स देयक/ गॅस बुक/ बँक पासबुक/ड्रायविंग लायसन्स/ रेशनिंग कार्ड यापैकी कोणतेही एक) व कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु.एक लाखापेक्षा कमी असल्याचा उत्पन्नाचा दाखला.उत्पन्नाच्या दाखल्याकरिता salary slip तहसीलदारांचा दाखला कंपनीचा किंवा Employer चा दाखला

१६)धार्मिक अल्प संख्यांक (मुस्लिम, बौध्द, ख्रिश्चन, पारसी, जैन व शीख.)यांनाप्रवेशासाठी कोणती कागदपत्रे आवश्यक आहेत?

**उत्तर**-जन्माचा दाखला, रहिवासी पुरावा(आधारकार्ड/पासपोर्ट/मतदार ओळख पत्र वीज बिल /टेलिफोन बिल/पाणी पट्टी/घर पट्टी/वाहन चालविण्याचा परवाना / भाडे तत्वावर राहणाऱ्या पालकांच्या बाबतीत

दुय्यम निबंधक कार्यालयाचा नोंदणीकृत भाडेकरारनाम्याची प्रत/ प्रॉपर्टी टॅक्स देयक/ गॅस बुक/ बँक पासबुक/ड्रायविंग लायसन्स/ रेशनिंग कार्ड यापैकी कोणतेही एक) व कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु.एक लाखापेक्षा कमी असल्याचा उत्पन्नाचा दाखला. उत्पन्नाच्या दाखल्याकरिता salary slip तहसीलदारांचा दाखला कंपनीचा किंवा Employer चा दाखला

१७)जन्माचा दाखला/प्रमाणपत्र कोणते पाहिजे?

**उत्तर**-आर.टी.ई. अधिनियम २००९ मधील भाग ४ मधील नियम ९ नुसार कलम १४ च्या प्रयोजनार्थ वयाचा पुरावा म्हणून स्वीकार करण्याजोगे दस्तऐवज:- जेथे जन्म व मृत्यू अधिनियम १९६९ (१९६९ चा १८)अन्वये जन्माचा दाखला उपलब्ध नसेल तेथे

पुढील दस्तऐवजांपैकी कोणताही एक दस्तऐवज हा शाळांमध्ये प्रवेश घेण्याच्या प्रयोजनासाठी बालकाच्या वयाचा पुरावा असल्याचे मानण्यात येईल.

अ) बालकाच्या जन्म ठिकाणच्या संबधात किंवा सहाय्यकारी परिचारिका व प्रसविका यांनी केलेली नोंद किंवा ठेवलेला अभिलेख.

आ) अंगणवाडी अभिलेख

ई) हा अभिलेख उपलब्ध नसेल तर, वंचितगटातील तसेच दुर्बल घटकांतीबालकाच्या बाबतीत जन्मदिनांक नमूद करणारे बालकाच्या एकतर मातेचे किंवा पित्याचे प्रतिज्ञापत्र,गावच्या सरपंचाने किंवा स्थानिक शाळेच्या मुख्याध्यापकाने किंवा शहरी वा निमशहरी क्षेत्राच्या बाबतीत शासनाने या संबधात अधिसूचित केलेल्या अधिकाऱ्याने प्रमाणित केलेले आई-वडिलांचे किंवा पालकांचे बालकाच्या वयाचे प्रतिज्ञापत्र.

स्पष्टीकरण:-__अशा बाबतीत बालकाला शाळेत प्रवेश देणाऱ्या अधिकाऱ्याहून वरिष्ठ दर्जाचा अधिकारी, जन्माच्या दाखल्याऐवजी स्वीकारकरण्याजोगे बालकाचे इतर दस्तऐवज हे वस्तुत: उपलब्ध नाहीत किंवा वस्तुत: मिळू शकत नाहीत याची खातरजमा करतील.

१८)जातीच्या प्रमाणपत्रासाठी प्राधिकृत कोण?

**उत्तर**- उपविभागीय अधिकारी/उपजिल्हाधिकारी हे प्राधिकृत आहेत.

परराज्यातील जातीचे प्रमाण पत्र ग्राहृय धरण्यात येणार नाहीत.

१९)उत्पन्नाचा दाखला कोणत्या वर्षाचा पाहिजे?

**उत्तर**- उत्पन्नाचा दाखला आर्थिक वर्ष २०१७-१८ किंवा २०१८-१९ चा पाहिजे.

२०)कोणत्या अधिकाऱ्याने दिलेला उत्पन्नाचा दाखला ग्राहृय धरता येईल?

**उत्तर**- उत्पन्नाचा दाखला किमान तहसीलदार दर्जाच्या महसूल अधिकाऱ्याने दिलेला असावा. उत्पन्नाच्या दाखल्याकरिता salary slip तहसीलदारांचा दाखला कंपनीचा किंवा Employer चा दाखला या पैकी कोणतेही एक .

२१)गुगलच्या नकाशात रहिवासाचे (घराचे)स्थान निश्चित करताना कोणती काळजी घ्यावी?

**उत्तर**- आपल्या स्वत:च्या घराचे स्थान निश्चित करताना रहिवासी पुराव्यावरील पत्ता पाहूनच नकाशात स्थान निश्चित करावे.

google map वर माझ्या राहत्या घराचे अचूक ठिकाण निवडून location बलून राहत्या घरावरच दर्शवावा . जिथ पर्यंत आपल्या निवासाच्या घरावर बलून दिसत नाही तिथ पर्यंत अर्ज submit करू नये . इतर ठिकाणी दाखविल्यास तो अर्ज चुकीचा धरला जाईल व प्रवेश रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी .

२२)पालक गुगलमॅपवर अचूक नोंद करण्यासाठी इतर साधनांची मदत घेऊ शकतील का?

**उत्तर-** गुगल प्ले-स्टोअर मध्ये Latitude व Longitude मोजण्यासाठी अनेक Apps फोन वर उपलब्ध आहेत. त्या मधील कोणतेही Apps मोबाइल फोनवर डाउनलोड करून पालक स्वत:च्या घराजवळ उभे राहून आपल्या घराचा Latitude व Longitude काढून ऑनलाईन अर्ज भरताना त्यांची मदतघेऊशकतात.

२३)गुगलप्ले-स्टोअर मध्ये कोणकोणते उपयोगी ॲप्स (Apps) आहेत?

उत्तर- घराचे व शाळांचे अचूक Latitude व Longitudeमोजण्यासाठी गुगलवर प्लेस्टोअरवर पुढील ॲप्स (Apps) आहेत.

१)my current location

२) Sea level

३) Address 2 lat.lon.

४) Latitude and longitude

५) Latitude coordinates

६) Gpslat long viewer

७) Latitude tracker

८) Latitude and longitude match

९) Gps coordinates

१०)आर.टी.ई. करिता स्वतंत्र मोबाइल ॲप उपलब्ध आहे.

२४)शाळा निवडताना कोणती काळजी घ्यावी?

**उत्तर शाळेचे प्रत्यक्ष ठिकाण, माध्यम, बोर्ड ,शाळा कितवी पसून कितवी पर्यंत आहे?याबाबत ची माहिती घेऊन शाळा निवडावी तसेच** शाळा निवडताना आपल्या रहिवासाचे स्थान आणि शाळा यातील अंतर हे हवाई अंतर (AIR DISTANCE) असल्याने रस्त्याने शाळा व घर यातील अंतर हे १ किंवा ३ कि.मी. पेक्षा जास्त असू शकते. त्यामुळे शाळा निवडताना दक्षता घेणे अत्यंत गरजेचे आहे.

२५)प्रवेशाची कार्यपद्धती कशी असेल?

**उत्तर**-शाळेच्या प्रवेश क्षमते पेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास सोडत/लॉटरी काढून प्रवेश निश्चित केले जातील व शाळेच्या प्रवेश क्षमतेपेक्षा कमी अर्ज प्राप्त झाल्यास, प्राप्त झालेल्या अर्जांपैकी सर्व पात्र अर्जदारांचा प्रवेशासाठी विचार केला जाईल.

२६)ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर अर्जाबाबतची पुढील कार्यवाही पालकांना कशी कळणार?

**उत्तर**- याबाबत पालकांना अर्जात नमूद केलेल्या मोबाईल क्रमांकावर एस.एम.एस.द्वारे सूचित केले जाईल. त्यामुळे अर्जात दिलेला मोबाईल क्रमांक,भरलेला अर्ज क्रमांक आणि पासवर्ड अर्जदारांनी प्रवेश प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सुरक्षित ठेवणे गरजेचे आहे.लॉटरी लागली आहे अथवा नाही हे पाहण्यासाठी आर.टी.ई. च्या पोर्टल वर homepage वर **Application wise details** या tab वर click करून त्या मध्ये आपला अर्ज क्रमांक लिहावा म्हणजे लॉटरी लागली आहे

अथवा नाही ते समजेल sms येण्याची वाट पाहू नये sms ही अतिरिक्त सुविधा आहे.

२७)प्रवेशासाठी निवड झाल्यानंतर प्रवेश कसा घ्यावा?

**उत्तर**- लॉटरी लागल्यावर आर.टी.ई च्या वेबसाईट वर जाऊन अर्ज क्रमांक आणि पासवर्ड लिहून login करावे आणि admit card या tab वर click करून प्राप्त शाळेच्या नावाचे Allotment letter ची प्रिंट काढावी .

दिलेल्या मुदतीतच पालकांनी Allotment letter ची प्रिंट घेऊन आपल्या विभागातील पडताळणी समितीकडे जावे पडताळणी समितीची यादी पत्ता वेबसाईटवर दिला जाईल .पडताळणी समिती कडे जाताना प्रवेशासाठीची आवश्यक त्या सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती व झेरोक्स प्रती घेऊन जाव्यात. पडताळणी समितीकडे जाऊन कागदपत्रे तपासून Allotment letter च्या प्रिंटवर स्वाक्षरी आणि शिक्का घेऊन मगच विहित मुदतीत प्राप्त शाळेत प्रवेशाकरिता जावे. पडताळणी समितीकडून तपासणी केल्याशिवाय शाळेत प्रवेश निश्चित होणार नाही याची नोंद घ्यावी .

२) प्रवेश प्रक्रीयेअंतर्गत एखाद्या शाळेत प्रवेश निश्चित झालेल्या बालकाने त्या शाळेत प्रवेश न घेतल्यास त्या बालकास त्या वर्षातील (सन २०१८-१९)पुढील प्रवेश फेऱ्यांच्या लॉटरी मध्ये सहभागी केले जाणार नाही.

२८)आर.टी.ई २५% ऑनलाईन प्रवेश प्रक्रीये अंतर्गत प्रवेश मिळाला अथवा नाही हे कसे समजेल?

उत्तर :- आर.टी.ई.२५ % ऑनलाईन प्रवेश प्राप्त झाल्यास पडताळणी समिती सदर बालकाला शाळेत प्रवेश दिल्याची पावती (Receipt)

पालकांना देईल  ती घेऊन पालकांनी त्यांना प्राप्त झालेल्या शाळेत विहित मुदतीत जाऊन प्रवेश घ्यावयाचा आहे

